Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - III MARCH 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील व्हॉलीबॉल व हँडबॉल खेळणाऱ्या समायोजन क्षमतेचा चिकित्सक अभ्यास

शैलेंद्र देवचंद गिरीपुंजे

डॉ. संजयकुमार सिंह
प्राचार्य
शरदराव पवार महाविद्यालय,गडचांदूर
जिल्हा चंद्रपूर

## १.० प्रस्तावना

मनुष्य जीवनात शिक्षणाला मात्र अत्यंत आवश्यक व महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. शिक्षण क्षमतेमुळेच मनुष्य इतर प्राण्यांपेक्षा अधिक विकासक्षम ठरला आहे, कर्तृत्ववान ठरला आहे. थोडक्यात, शिक्षण म्हणजेच व्यक्तीचा सर्वांगीण विकास, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात ज्ञान, आकलन कौशल्य, उपयोजनक्षमता, अभिरूची व अभिवृत्ती रसग्रहण अशा पाच घटकांचा सहभाग केला जातो. शारीरिक शिक्षण हा शिक्षणाचाच एक भाग आहे, त्यामुळे शारीरिक शिक्षणाला शिक्षणापासून वेगळे करता येणार नाही. साधारणत: माणसाला दोनप्रकारे अनुभव मिळतात, बुद्धीद्वारे व दुसरे शारीरिक हालचालीद्वारे. शारीरिक शिक्षण हे शारीरिक हालचालीचे शिक्षण असले तरी त्यामध्ये मस्तिष्काचा वापर करावा लागतो.

खेळाडूच्या व्यवहाराला प्रभावित करणारे प्रमुख तीन घटक खेळाडू, प्रशिक्षक आणि वातावरण जे की, हे सगळे घटक परस्पर संबंध खेळात स्थापित करतात, त्यामुळे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कोणत्याही सांघिक खेळाला संघ नियंत्रण हे खेळाच्या उत्तम प्रदर्शनाचा आधार आहे, कोणत्याही खेळाच्या खेळाडूला शारीरिक क्षमतेबरोबरच उत्तम गुणांची, उत्तम कौशल्याची आवश्यकता उत्तम प्रदर्शनाकरिता आवश्यकता असते, त्याचबरोबर खेळाच्या उत्तम प्रदर्शनाकरिता व सामना जिंकण्याकरिता समायोजन क्षमता देखील अत्यंत आवश्यक आहे. उत्तम समायोजन क्षमतेच्या माध्यमातून आवश्यक वेळी, योग्य सूचना देऊन खेळाडूच्या उत्तम गुणांचा व कौशल्याचा उपयोग करता येतो. समायोजन क्षमता शारीरिक विधी किंवा पद्धत नाही, तर खेळाडूला त्याचप्रमाणे संघाला मनोवैज्ञानिक दृष्टीने तयार करणे, व्हॉलीबॉल व हँडबॉल या सारख्या खेळात सांघिक समायोजन क्षमतेची फार आवश्यकता असते. व्हॉलीबॉल व हँडबॉल हे मैदानी खेळ ‘मनोरंजन’ व ‘व्यावसायिक’ या दोन्ही स्वरुपात खेळल्या जातात. हे खेळ लोकप्रिय असले तरी चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयांमधील खेळाडूंमध्ये या खेळातील समायोजन क्षमतेबाबत काही प्रश्न असल्यामुळे राष्ट्रीय स्तराचे खेळाडू निर्माण होण्यात अनेक अडचणी आहेत. याकरीता प्रस्तुत संशोधन करण्यात आले आहे.

## २.० संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील व्हॉलीबॉल व हँडबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या समायोजन क्षमतेचा चिकित्सक अभ्यास करण्याकरीता सर्वेक्षण पद्धतीची निवड केलेली आहे.

**२.१ अध्ययन क्षेत्र** – चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे

### २.२ अध्ययन विश्व

प्रस्तुत संशोधनात विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हांचा अध्ययन विश्व म्हणून समावेश करण्यात आला आहे.

### २.३ जनसंख्या

प्रस्तुत संशोधनामध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील व्हॉलीबॉल व हँडबॉल खेळणारे सर्व खेळाडू जनसंख्येत मोडतात.

### २.४ न्यादर्श पद्धती व नमुना निवड

प्रस्तुत संशोधनकार्यात संशोधनकर्त्याने संभाव्यता पद्धतीतील साधा यादृच्छिक नमुना पद्धतीने नमुना निवडण्यात आला आहे. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यामधून व्हॉलीबॉल व हँडबॉल क्रीडा प्रकारातील प्रत्येकी १५० पुरूष खेळाडूची निवड करण्यात आली. निवडण्यात आलेल्या खेळाडूंची वयोमर्यादा १८ ते २५ वर्षे होती.

### २.५ संशोधन आराखडा

या संशोधनकार्यात तथ्यांचे संकलन व विश्लेषण यासाठी आवश्यक अटीची पूर्तता करून वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे.

### २.६ तथ्य संकलन

प्रस्तुत अध्ययनात प्रमाणित परिक्षण चाचणी अनुसूची तंत्राचा वापर करण्यात आला. प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही माध्यमांच्याद्वारे तथ्य संकलन करण्यात आले.

### २.७ प्राथमिक तथ्य संकलन

संशोधनाकरीता आवश्यक असलेली माहिती एकत्रित करण्याकरीता प्रश्नावली या साधनाचा उपयोग करण्यात आला. समायोजन क्षमता जाणुन घेण्याकरीता ए. के. पी. सिन्हा आणि आर. पी. सिंग यांनी तयार केलेली Adjustment Inventory for college students या चाचणीचा वापर करण्यात आला.

### तथ्यांचे सांख्यकिय विश्लेषण

प्रस्तुत संशोधनकार्यात प्राप्त माहितीवरुन वारंवारीता व बहुलक काढण्यात आले. त्याचप्रमाणे माहितीच्या विश्लेषणाकरीता काई वर्ग मूल्य चाचणीचा वापर करण्यात आला. Significance Level ०.०५ निर्धारीत करण्यात आली.

## ३.० सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन समायोजन स्तर

### ३.१ कौटुंबिक समायोजन स्तर

**सारणी क्र. १: व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंच्या कौटुंबिक समायोजन स्तरासंबंधी माहिती**

| समायोजन स्तर | व्हॉलीबॉल खेळाडू | | हॅन्डबॉल खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| अत्याधिक | १६ | १०.७ | ३५ | २३.३ |
| साधारणपेक्षा अधिक | ६८ | ४५.३ | ५० | ३३.३ |
| साधारण | ४२ | २८.० | २६ | १७.३ |
| कमी | १५ | १०.० | १९ | १२.७ |
| अत्यंत कमी | ९ | ६.० | २० | १३.३ |
| एकुण | १५० | १००.० | १५० | १००.० |
| | काई वर्ग मूल्य:– ८१.६६७, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:–९.४९, P मूल्य:–<0.05 | | काई वर्ग मूल्य:– २२.०६७, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:– ९.४९, P मूल्य:–<0.05 | |

वरील सारणी क्र. १ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळाडूंच्या कौटुंबिक समायोजन स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १०.७ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा कौटुंबिक समायोजन स्तर अत्याधिक असून ४५.३ टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक असल्याचे आढळले. तसेच २८ टक्के खेळाडूंचा कौटुंबिक समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे १०.० व ६.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा कौटुंबिक समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.
- **हॅन्डबॉल खेळाडू** : वरील सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २३.३ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा कौटुंबिक समायोजन स्तर अत्याधिक असून ३३.३ टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक होता. तसेच १७.३ टक्के खेळाडूंचा कौटुंबिक समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे १२.७ व १३.३ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा कौटुंबिक समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.

### ३.२ स्वास्थ्य समायोजन स्तर

**सारणी क्र. २: व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंच्या स्वास्थ्य समायोजन स्तरासंबंधी माहिती**

| समायोजन स्तर | व्हॉलीबॉल खेळाडू | | हॅन्डबॉल खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| अत्याधिक | ४८ | ३२.० | ६८ | ४५.३ |
| साधारणपेक्षा अधिक | ५३ | ३५.३ | ५० | ३३.३ |
| साधारण | २६ | १७.३ | १९ | १२.७ |
| कमी | १२ | ८.० | ८ | ५.३ |
| अत्यंत कमी | ११ | ७.३ | ५ | ३.३ |
| एकुण | १५० | १००.० | १५० | १००.० |
| | काई वर्ग मूल्य:– ५१.८, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:– ९.४९, P मूल्य:–<0.05 | | काई वर्ग मूल्य:– १०२.४६७, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:– ९.४९, P मूल्य:–<0.05 | |

वरील सारणी क्र. २ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळाडूंच्या स्वास्थ्य समायोजन स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ३२.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा स्वास्थ्य समायोजन स्तर अत्याधिक असून ३५.३ टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक असल्याचे आढळले. तसेच १७.३ टक्के खेळाडूंचा स्वास्थ्य समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे ८.० व ७.३ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा स्वास्थ्य समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.
- **हॅन्डबॉल खेळाडू** : वरील सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ३६.७ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा स्वास्थ्य समायोजन स्तर अत्याधिक असून २८.७ टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक होता. तसेच १२.७ टक्के खेळाडूंचा स्वास्थ्य समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे ५.३ व ३.३ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा स्वास्थ्य समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.

## ३.३ सामाजिक समायोजन स्तर

**सारणी क्र. ३: व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंच्या सामाजिक समायोजन स्तरासंबंधी माहिती**

| समायोजन स्तर | व्हॉलीबॉल खेळाडू | | हॅन्डबॉल खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| अत्याधिक | ३९ | २६.० | १४ | ९.३ |
| साधारणपेक्षा अधिक | ६२ | ४१.३ | २७ | १८.० |
| साधारण | ३१ | २०.७ | ५८ | ३८.७ |
| कमी | १० | ६.७ | ३० | २०.० |
| अत्यंत कमी | ८ | ५.३ | १९ | १२.७ |
| एकुण | १५० | १००.० | १४८ | ९८.७ |
| | काई वर्ग मूल्य:– ६६.३३३, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:– ९.४९, **P** मूल्य:–<0.05 | | काई वर्ग मूल्य:– ३९.५, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:– ९.४९, **P** मूल्य:–<0.05 | |

वरील सारणी क्र. ३ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या सामाजिक समायोजन स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २६.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा सामाजिक समायोजन स्तर अत्याधिक असून ४१.३ टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक असल्याचे आढळले. तसेच २०.७ टक्के खेळाडूंचा सामाजिक समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे ६.७ व ५.३ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा सामाजिक समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.
- **हॅन्डबॉल खेळाडू** : वरील सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ९.३ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा सामाजिक समायोजन स्तर अत्याधिक असून १८.० टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक होता. तसेच ३८.७ टक्के खेळाडूंचा स्वास्थ्य समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे २०.० व १२.७ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा स्वास्थ्य समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.

## ३.४ भावनिक समायोजन स्तर

**सारणी क्र. ४: व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंच्या भावनिक समायोजन स्तरासंबंधी माहिती**

| समायोजन स्तर | व्हॉलीबॉल खेळाडू | | हॅन्डबॉल खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| अत्याधिक | ३७ | २४.७ | २४ | १६.० |
| साधारणपेक्षा अधिक | ६२ | ४१.३ | १६ | १०.७ |
| साधारण | ३० | २०.० | ५४ | ३६.० |
| कमी | १२ | ८.० | २७ | १८.० |
| अत्यंत कमी | ९ | ६.० | २९ | १९.३ |
| एकुण | १५० | १००.० | १५० | १००.० |
| | काई वर्ग मूल्य:– ६१.२६७, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:– ९.४९, **P** मूल्य:–<0.05 | | काई वर्ग मूल्य:– २७.२६७, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:– ९.४९, **P** मूल्य:–<0.05 | |

वरील सारणी क्र. ४ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या

भावनिक समायोजन स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २४.७ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा भावनिक समायोजन स्तर अत्याधिक असून ४१.३ टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक असल्याचे आढळले. तसेच २०.० टक्के खेळाडूंचा भावनिक समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे ८.० व ६.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा भावनिक समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.
- **हॅन्डबॉल खेळाडू** : वरील सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १६.० टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा भावनिक समायोजन स्तर अत्याधिक असून १०.७ टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक होता. तसेच ३६.० टक्के खेळाडूंचा भावनिक समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे १८.० व १९.३ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा भावनिक समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.

## ३.५ शैक्षणिक समायोजन स्तर

**सारणी क्र. ५: व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंच्या शैक्षणिक समायोजन स्तरासंबंधी माहिती**

| समायोजन स्तर | व्हॉलीबॉल खेळाडू | | हॅन्डबॉल खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| अत्याधिक | १३ | ८.७ | २३ | १५.३ |
| साधारणपेक्षा अधिक | १७ | ११.३ | ३४ | २२.७ |
| साधारण | ३९ | २६.० | ५७ | ३८.० |
| कमी | ५३ | ३५.३ | २२ | १४.७ |
| अत्यंत कमी | २८ | १८.७ | १४ | ९.३ |
| एकुण | १५० | १००.० | १५० | १००.० |
| | काई वर्ग मूल्य:– ३५.७३३, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:– ९.४९, **P** मूल्य:–<0.05 | | काई वर्ग मूल्य:– ३७.१३३, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:– ९.४९, **P** मूल्य:–<0.05 | |

वरील सारणी क्र. ५ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या शैक्षणिक समायोजन स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ८.७ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा शैक्षणिक समायोजन स्तर अत्याधिक असून ११.३ टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक असल्याचे आढळले. तसेच २६.० टक्के खेळाडूंचा शैक्षणिक समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे ३५.३ व १८.७ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा शैक्षणिक समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.
- **हॅन्डबॉल खेळाडू** : वरील सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १५.३ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा शैक्षणिक समायोजन स्तर अत्याधिक असून २२.७ टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक होता. तसेच ३८.० टक्के खेळाडूंचा शैक्षणिक समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे १४.७ व ९.३ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा शैक्षणिक समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.

## ३.६ सर्वांगीण समायोजन स्तर

**सारणी क्र. ६: व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंच्या सर्वांगीण समायोजन स्तरासंबंधी माहिती**

| समायोजन स्तर | व्हॉलीबॉल खेळाडू | | हॅन्डबॉल खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| अत्याधिक | १९ | १२.७ | ३६ | २४.० |
| साधारणपेक्षा अधिक | ५६ | ३७.३ | ४६ | ३०.७ |
| साधारण | ३४ | २२.७ | २४ | १६.० |
| कमी | २६ | १७.३ | २१ | १४.० |
| अत्यंत कमी | १५ | १०.० | २३ | १५.३ |
| एकुण | १५० | १००.० | १५० | १००.० |
| | काई वर्ग मूल्य:– ३५.१३३, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:– ९.४९, **P** मूल्य:–<0.05 | | काई वर्ग मूल्य:– १५.२६७, स्वातंत्र्यांश – ४, तालिका मूल्य:– ९.४९, **P** मूल्य:–<0.05 | |

वरील सारणी क्र. ६ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या

सर्वागीण समायोजन स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १२.७ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा सर्वागीण समायोजन स्तर अत्याधिक असून ३७.३ टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक असल्याचे आढळले. तसेच २२.७ टक्के खेळाडूंचा सर्वागीण समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे १७.३ व १०.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचा सर्वागीण समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.
- **हॅन्डबॉल खेळाडू** : वरील सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २४.० टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा सर्वागीण समायोजन स्तर अत्याधिक असून ३०.७ टक्के खेळाडूंचा समायोजन स्तर साधारणपेक्षा अधिक होता. तसेच १६.० टक्के खेळाडूंचा सर्वागीण समायोजन स्तर साधारण असून अनुक्रमे १४.० व १५.३ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंचा सर्वागीण समायोजन स्तर कमी व अत्यंत कमी असल्याचे आढळले.

**४.० निष्कर्ष**

**४.१ कौटुंबिक समायोजन स्तर**

प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे कौटुंबिक समायोजन साधारणपेक्षा अधिक स्तराचे आहे.

**४.२ स्वास्थ्य समायोजन स्तर**

- प्रस्तुत संशोधनकार्यातील माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल खेळणारे महाविद्यालयीन खेळाडूंचे स्वास्थ्य समायोजन साधारणपेक्षा अधिक स्तराचे तसेच हॅन्डबॉल खेळणाऱ्या खेळाडूंचे स्वास्थ्य समायोजन अत्याधिक स्तराचे आहे.

**४.३ सामाजिक समायोजन स्तर**

- प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे सामाजिक समायोजन साधारणपेक्षा अधिक स्तराचे असून हॅन्डबॉल खेळणारे महाविद्यालयीन खेळाडूंचे सामाजिक समायोजन साधारण स्तराचे आहे.

**४.४ भावनिक समायोजन स्तर**

- प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे सामाजिक समायोजन अनुक्रमे साधारणपेक्षा अधिक, साधारण व कमी स्तराचे आहे.

**४.५ शैक्षणिक समायोजन स्तर**

- प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे शैक्षणिक समायोजन कमी असून हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे शैक्षणिक समायोजन साधारण स्तराचे आहे.

**४.६ सर्वागीण समायोजन स्तर**

- प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे सर्वागीण समायोजन साधारणपेक्षा अधिक असून कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे सर्वागीण समायोजन साधारण स्तराचे आहे.

**५.० संदर्भग्रंथ सूची**

१. आलेगांवकर प.म., 'प्रगत क्रीडामानसशास्त्र' प्रकाशक अनिरुद्ध अनंत कुळकर्णी, कॉन्टिनेन्टल, विजयनगर, पुणे ३०, प्रथम आवृत्ती १९९४, पृ. क्र. ३, २१.

२. कोठीवाले, द.ब.: शारीरिक शिक्षणाचा विकास, भाग १, श्रीलेखन व वाचन, भांडार रस्ता पुणे २ मुद्रक श्री द.वा. आंबेकर, आर्यभूषण मुद्रणालय ९१५/१, शिवाजीनगर, पुणे, (१९६७) पृ.क्र.२३.

३. धुरी नी., संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती २००८, पृ.क्र. १.

४. बोधनकर सु., अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३, पृ. १४७.

५. कुंडले म.बा., कुळकर्णी दामोदर दिनकर, 'शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक मानसशास्त्र' प्रकाशक – महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, श्री विद्या प्रकाशन २५०, शनिवार पेठ, अष्टपूजा रस्ता पुणे ३०, पृ.क्र. २८–२९.

६. घाटोळे. रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००९–१०.पृ.क्र. १ ते २३.

७. वाखारकर, वि.गो. व आलेगांवकर प.म. ''शारीरिक शिक्षणाचे ऐतिहासिक स्वरूप'' पुणे, पार्वती प्रकाशन, १९८४, पा.नं २४.

८. भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती मंडळ, विद्या बुक्स, औरंगाबाद, १९७६:१४७.

९. पाण्डेय लक्ष्मीकांत : भारतीय खेलोंकी मिमांसा, मेट्रोपोलिटियन बुक कं. प्रा. लि. नई दिल्ली, पान क्र. १५.